**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक 10/11/2025**

**आरोपी लोकसेवक** - श्री. आधार बाजीराव भिसे, पोलीस आम. ब.नं.1651 नेमणूक - पोलीस ठाणे बदनापूर जि. जालना यांनी तक्रारदार यांच्या कडुन 70,000/- (सत्तर हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे बदनापूर ता. बदनापूर , जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. आधार बाजीराव भिसे, वय 32 वर्ष, व्यवसाय :- नौकरी, पद - पोलीस आम. ब.नं.1651 नेमणूक - पोलीस ठाणे बदनापूर ता. बदनापूर , जि. जालना रा. भांबरडा. जोशीवाडी ता.जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 1,00,000/- (एक लाख रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 70,000/- (सत्तर हजार रुपये) |
| सापळा अधिकारी | श्री. शांतीलाल चव्हाण, पद पोलिस निरीक्षक, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांचे पुतण्यावरती पो.स्टे. बदनापूर येथील हरी बाबुराव जोगदंड राहणार दलालवाडी तालुका बदनापुर जिल्हा जालना यांनी त्यांची मुलगी नामे श्रावणी हिचे प्रेम प्रकरणामुळे गावात व समाजात होत असलेल्या बदनामीमुळे तिला दिनांक 05/09/2025 ला घरी झोपलेली असताना तिला मारहाण करून तिचा दोन्ही हाताने गळा दाबून तिला जीवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्यासाठी गळफास देऊन तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला होता. परंतु पी.एम. रिपोर्ट नुसार मुलीच्या मरणाचे कारण मारहाण व गळा दाबून केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार बी.एन.एस. 103 (i) व 138 (a)प्रमाणे गुन्हा दाखल पो.स्टे. बदनापूर येथे झाला सदर गुन्ह्यातील आरोपी अमोल कदम व सचिन कदम तक्रारदार यांचे पुतणे यांना पी.सी.आर व चार्जशीट मध्ये मदत करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 100,000/लाख रुपयाची मागणी करून तडजोडी अंती 70,000/ हजार रुपयांची लाच मागणी केली होती. तक्रारदारास लाच रक्कम द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 10/11/2025 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे PCR व व चार्जशीट मध्ये वरिष्ठांना सांगून मदत करण्यासाठी 100,000/-लाख रुपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती 70,000/- हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 10/11/2025 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान पोलीस ठाणे बदनापूर ता. बदनापूर जि. जालना येथे आलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 70,000/-हजार रुपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली. आलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर पंच समक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे बदनापूर ता. बदनापूर , जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केलेली आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री सुरेश ह. नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री शांतीलाल चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ रविंद्र काळे, अशोक नागरगोजे, चालक पोअ/ सी. एन बागुल ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, **टोल फ्रि क्रं. 1064,**
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

10/11/2025

सुरेश ह. नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर